# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.आयुक्त तथा प्रशासक
नगरसचिव कार्यालय

---

## प्रशासकीय महासभा क्रमांक १४

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सर्वसाधारण महासभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **शुक्रवार दिनांक २१/०२/२०२५ दुपारी १२-३० वाजता स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर बैठकीचे इतिवृत्त

सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती शोभा बाविस्कर | उपायुक्त |
| ३. | श्री हेमंत निकम | उपायुक्त |
| ४. | श्री.किशोर सुडके | सहा. आयुक्त |
| ५. | श्रीमती स्वालिया मालगावे | सहा. आयुक्त |
| ६. | श्रीमती प्रांजली मुंडे | सहा.आयुक्त |
| ७. | श्री. बाळासाहेब तटटू | मुख्य लेखाअधिकारी |
| ८. | श्री. शाहेद मो. युसुफ शेख | मुख्य लेखापरीक्षक |
| ९. | श्रीमती वर्षा घुगरी | कार्यकारी अभियंता, स्थापत्य |
| १०. | श्री नवनित सोनवणे | कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा |
| ११. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| १२. | डॉ.संपदा कुलकर्णी | प्र.आरोग्याधिकारी |
| १३. | श्री. राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरिक्षक |
| १४. | श्री. प्रकाश सोनवणे | उपअभियंता नगररचना विभाग |
| १५. | श्री कमलेश सोनवणे | सहा.अभियंता |
| १६. | श्री.के डी साबळे | लिपीक,आस्थापना विभाग |
| १७. | श्री चंद्रकांत उगले | उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग |
| १८. | श्री. पी.डी. चव्हाण | उप अभियंता, बांधकाम विभाग |
| १९. | श्री. एन. के. बागुल | उप अभियंता, विद्युत विभाग |
| २०. | श्री हेमंत पावटे | कनिष्ठ अभियंता, बांधकाम |
| २१. | श्री.प्रसाद जाधव | अतिक्रमण विभागप्रमुख |
| २२. | श्री अनिल भडागे | प्र.वाहन विभागप्रमुख |
| २३. | श्री अमोल सोनवणे | अग्नीशमन विभाग |
| २४. | श्री.चंद्रकांत जाधव | मलेरिया पर्यवेक्षक |
| २५. | श्री.रविकिरण पाटकरी | प्र.वृक्षसमिती प्रमुख |
| २६. | श्री राजेश गायकवाड | शिक्षण मंडळ |
| २७. | मधूकर निकुंभे | मालमत्ता अधिक्षक |
| २८. | चंद्रकांत मोरे | लेखा विभाग |

म.नगरसचिव — वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

मा. नगरसचिव — आजच्या सभेत आपल्या महानगरपालिकेतील सहा. आयुक्त श्रीमती स्वालिया मालगावे व प्रांजली मुंडे यांना शासनामार्फत नुकतीच पदोन्नती मिळाली असून या अभिनंदनीय नियुक्ती बद्दल सन्मान करण्यात येत असून त्यांना पुढील वाटचालीसाठी मा. आयुक्त तथा प्रशासक महोदया यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

**मा.प्रशासक:-** — आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

विषय क्रमांक:-१३४ सन 2024-25 या आर्थिक वर्षासाठी नागरी दलितेत्तर योजना अंतर्गत प्रस्ताव सादर करणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. उपअभियंता सन २०२४-२५ आर्थिक वर्षासाठी नागरी दलितेतर योजना अंतर्गत सदरचे काम प्रस्तावित केले आहे. नागरी दलितेतर योजनेअंतर्गत १०० टक्के निधी आपल्याला मिळणार आहे. सदर प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी महोदय यांच्याकडे सादर करणेसाठी विषय महासभेपुढे ठेवण्यात आला आहे. हे एकच काम असुन यात धुळे मनपा हददीतील प्र.क्र.२ सर्व्हे क्रं. ६४/१ कुवरनगर येथील खुल्या जागेचे सुशोभिकरण करणे व सोलर हायमास्ट बसविणेकामी मा. पालकमंत्री महोदयांनी आपल्याकडे पाठविले आहे. सन २०२४-२५ च्या जिल्हा नियोजन मंडळाकडील अखर्चित निधीतुन सदर काम प्रस्तावित होणार आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १३४ दिनांक २१/०२/२०२५**

सन 2024-25 या आर्थिक वर्षासाठी नागरी दलितेत्तर योजना अंतर्गत खालील तक्त्यात नमुद कामांचे परिपूर्ण प्रस्ताव आवश्यक तांत्रिक मान्यता व अनुषंगिक परवानग्यासह सादर करणे बाबत मा पालकमंत्री सो यांच्या कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे.

| अ.क्र. | ता कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १. थों पि | धुळे मनपा हद्दीतील प्र क्र २ सर्वे क्र ६४/१ कुवर नगर येथील खुल्या जागेचे सुशोभिकरण करणे,अंतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरण करणे व सोलर हायमास्ट बसविणे. | २,००,००,०००/- |

उक्त प्रकरणी सन 2024-25 अंतर्गत इकडील कार्यालयाकडून 1 ते 32 कामांचा प्रस्ताव म.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आलेला असुन सदर कामांना म.जिल्हाधिकारी धुळे यांच्या कार्यालयामार्फत 1 ते 32 कामांना प्रशासकीय मान्यता आदेश प्राप्त आहे.

शासन निर्णयानुसार कामांचा निकष ठरवून प्रस्ताव तयार करणेकामी कामांची निश्चिती होवून ठराव पारित करणेसाठी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता असणे आवश्यक असल्याने सदरचा विषय मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार सन 2024-25 या आर्थिक वर्षासाठी जिल्हा नियोजन मंडळाकडील अखर्चित निधीतून नागरी दलितेत्तर योजना अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील प्र क्र 2 सर्वे क्र 64/1 कुवर नगर येथील खुल्या जागेचे सुशोभिकरण करणे,अंतर्गत रस्ते कॉंक्रीटीकरण करणे व सोलर हायमास्ट बसविण्याचे काम प्रस्तावित करण्यास मान्यता वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१३५ धुळे शहरातील मील परिसर शाळा क्र. 28 (सर्व्हे नं. 561) च्या मोकळ्या जागेत क्रीडा संकुल व व्यापारी संकुल उभारणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

सहा.अभियंता न.र. धुळे शहराचे मा. आमदार श्री. अनुपजी अग्रवाल यांनी दिलेल्या पत्रानुसार मिल परिसरातील मनपा शाळा क्रं. २८ सर्व्हे नं.५६१ येथे मोठे मैदान उपलब्ध असुन सदर जागेवर क्रिडा संकुल व व्यापारी संकुल उभारणेबाबत कळविले आहे. धुळे शहर मंजुर विकास आराखडयानुसार सदर जागा ही मिळकत रहिवास सार्वजनिक विभागात समाविष्ट असुन यात अस्तित्वातील मनपा शाळा क्रं.२८ दर्शविले आहे. शासनाच्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील तरतुद १५ टक्के वाणिज्य वापरासह अपेक्षित वापर अनुज्ञेय आहे. सद्यस्थितीत धुळे मनपा मालकीची शाळा, शौचालय, मनपा दवाखाना, व्यायामशाळा, पाण्याची टाकी दिसुन येते. स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले असुन सद्यस्थितीत सदर इमारतीचा वापर समता विद्यालय करीत आहे. सदर इमारत ही सुमारे १०० वर्षापुर्वीची असल्याचे दिसुन येते. सद्यस्थितीत इमारत वहिवाटीसाठी किंवा कोणत्याही वापरासाठी योग्य नाही असे कळविले आहे. उक्त जागेत मैदानावर क्रिडा संकुल व व्यापारी संकुल अनुज्ञेय होईल. त्यानुसार सदर विषय मे. महासभेपुढे सादर करण्यात आला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक मुळ वापर शाळेचा आहे. तेथे शाळा आवश्यक आहे. तेथे पटसंख्या काय आहे.

मा. शि.मंडळ लिपीक सर्व महाराष्ट्रातील शासकीय शाळा सीबीएसई पॅटर्न करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यामुळे त्या जागेत विद्यार्थी संख्या वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे शाळेसाठी इमारत ठेवणे गरजेचे आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक याबरोबर तुम्ही एक अहवाल द्या. अशा किती शाळा आहे ज्या तातडीने नव्या कराव्या लागतील,दुरुस्त कराव्या लागतील. १०० दिवसाच्या कार्यक्रमात आपण घेतले आहे. ज्यादुरुस्त करुन चालवता येतील त्या सर्व घ्यायच्या आहे. प्रत्येक शाळा व इमारत निहाय मला सर्वांचे फोटो पाहिजे. इलेक्शनच्या पार्श्वभुमीवर शाळांमध्ये डागडुज्या केल्या होत्या. या बजेटमध्ये ३ ते ४ कोटीची प्रोव्हिजन ठेवली आहे. त्याचा फायदा घेवुन या शाळा दुरुस्ती करुन अद्यावत कराव्या. जेणेकरुन विद्यार्थ्यांची संख्या वाढेल. आणि २८ नंबर शाळेच्या बाबतीत इमारत बांधणे, क्रिडांगण डेव्हलप करणे, व्यापारी संकुल करणे याला मंजुरी देतोय. शाळेची अस्तित्वातील जागेवर नव्याने शाळेची इमारत बांधावी. उर्वरीत जागेत क्रिडा संकुल व व्यापारी संकुल करावे. प्रथम शाळेचे बांधकाम करावे, नंतर बाकीची कामे करावी. त्यानुसार प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १३५ दिनांक २१/०२/२०२५**

वाचा क्र.०१ व सहा.अभियंता, नगररचना विभाग, यांचा वाचा क्रमांक २ चा प्रस्ताव तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदी नुसार प्रशासक,धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

धुळे शहराचे मा. आमदार श्री. अनुपजी अग्रवाल यांनी धुळे शहर मील परिसरातील मनपा शाळा क्र. 28 सर्व्हे नं. 561 येथे मोठे मैदान उपलब्ध आहे. त्या जागेवर क्रीडा संकुल व त्यासोबत व्यापारी संकुल उभारल्यास मनपा ला महसूल प्राप्त होईल, या अनुषंगाने मनपा शाळा क्र. 28 येथील असलेले मैदानावर क्रीडा संकुल व व्यापारी संकुल उभारण्याबाबत योग्य ती प्रक्रीया करण्याबाबत विनंती केली आहे. तसेच माजी नगरसेवक श्री. अमोल मासुळे दिलेल्या विषयांकित प्रकरणी विनंती केली आहे.

त्यानुषंगाने धुळे शहर मंजूर विकास योजना (दु.सु) आराखड्यानुसार सर्व्हे नं. 561 हि मिळकत रहिवास व भागः सार्वजनिक व निम सार्वजनिक विभागात समाविष्ट असून यात अस्तित्वातील मनपा मालकीचे शाळा क्र. 28 PRIMARY SCHOOL दर्शविले आहे.

तसेच शासनाच्या एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील तरतूद 4.10 (v) व (vi), नुसार 15% वाणिज्य वापरासह अपेक्षित वापर अनुज्ञेय आहे.

तथापि जागेवर सध्या स्थिती धुळे महानगपालीकेची मालकीचे शाळा, शौचालय, मनपा दवाखाना, व्यायाम शाळा पाण्याची टाकी दिसून येते. तसेच सदर प्रकरणी जागेवरील अस्तित्वातील शाळेच्या बांधकामाच्या अनुषंगाने विकासणापूर्वी इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले असून, खालील प्रमाणे अहवाल प्राप्त आहे.

Building No. १ - धुळे महानगरपालिका शाळा क्र. 28

सध्या स्थिती सदर इमारतीच्या वापर समता विद्यालय वापर करीत आहे. सदर इमारत हि सुमारे 100 वर्ष पूर्वी ची असल्याचे दिसून येते. सदर बांधकाम हे load bearing चे बांधकाम आहे. इमारतीचे maintenance जसे colouring, electrical work, plumbing, plastering, waterproofing etc. वेळोवेळी न केल्यामुळे सध्या स्थितीत इमारत वहिवाटीसाठी किंवा कोणत्याही वापरासाठी योग्य नाही.

Building No. 2 - शिक्षा अभियान ऑफिस व शौचालय

सदर इमारतीचे बांधकाम हे सुमारे 2005 मध्ये झाले असून, RCC Structure चे बांधकाम आहे. तसेच सध्या स्थितीत इमारत हि वहिवाटीसाठी किंवा कोणत्याही वापरासाठी योग्य नाही. असे कळविले आहे.

तसेच सद्यास्थिती सदर जागेवर मनपा शाळा क्र.28, सार्वजनिक शौचालय, मनपा दवाखाना व पाण्याची टाकी इ. बांधकाम आहे. त्यानुसार शाळे बावत शिक्षण विभागाने, तसेच जागेवरील अस्तित्वातील मनपा दवाखाना बाबत आरोग्य विभागाने व बांधकाम विभागाने खालील प्रमाणे अभिप्राय सादर केला आहे.

त्यानुषंगाने 1. वैद्यकीय आरोग्य अधिकारी धुळे महानगरालिका, धुळे यांनी जा.क्र./ धुमपा/आरोग्य/458 दि. 21/2/2025 रोजी अहवाल सादर केला आहे. त्यानुसार सदर ठिकाणी धुळे मनपा चे आरोग्य विभागाचे डॉ. सुभाषचंद्र राजवाडे दवाखाना असून, सदर ठिकाणी राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान अंतर्गत प्रस्तुतीगृह बनविण्याचे काम सुरु आहे. तरी दवाखाना व प्रस्तुतीगृहाच्या व्यतिरिक्त उर्वरित जागे मध्ये बांधकाम करण्यास हरकत नाही, येणे प्रमाणे अभिप्राय कळविले आहे.

2. तसेच प्रशासन अधिकारी महानगरपालिका शिक्षण मंडळ, धुळे यांनी जा.क्र. / धुमपा/मनपाशिमं/309 दि. 24/2/2025 रोजी सादर केले आहे. त्यानुसार मनपा शाळा क्र. 28 इमारतीचे एकूण खोल्यांपैकी 2 वर्ग खोल्या अध्यापना साठी वापरात 1 वर्ग खोली आरोग्य विभागाकडे दिलेली आहे. तरी सदर प्रस्तावात मंजुरी देतांना शाळा क्र. 28 धुळे साठी भौतिक सुविधासह वर्ग खोल्या इतर बाबी सह परीपुर्वक इमारत उपलब्ध होणे देखील आवश्यक आहे. तरी अंतिम निर्णय धुळे मनपा यांचा आहे. येणे प्रमाणे अहवाल सादर केला आहे.

3. उप अभियंता, बांधकाम विभाग धुळे महानगरपालिका धुळे यांनी जा.क्र./ धुमपा//922 दि. 24/2/2025 रोजी अहवाल सादर केला आहे. त्यानुसार मनपा शाळा क्र. 28 मालकीचे 10 सिट चे 03 शौचालय, स्वामी विवेकानंद व्यायाम शाळा ई. मनपा शाळा क्र. 28 जागेत मनपाच्या वस्तू आहेत. येणे प्रमाणे अहवाल सादर केला आहे.

त्यानुषंगाने धुळे शहर सुधारित मंजूर विकास योजना (दु. सु.) आराखड्यानुसार सर्व्हे नं. 561 मधील अस्तित्वातील प्राथमिक शाळा ही PUBLIC & SEMI PUBLIC विभागात समाविष्ट असुन उक्त जागेत मैदानावर क्रीडा संकुल व व्यापारी संकुल अनुज्ञेय होईल. त्यानुसार सदर विषय मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता सदर ठिकाणी शाळेच्या निकषानुसार असणारी आवश्यक जागा सोडून तसेच सदर

जागेतील दवाखाना व प्रसूतीगृह व अस्तित्वातील जलकुंभ व व्यायामशाळेच्या जागेच्या व्यतिरिक्त उर्वरित जागेत क्रीडा संकुल व व्यापारी संकुल उभारणेस मान्यता देणेत येत आहे. याबाबत शिक्षण मंडळ, बांधकाम, आरोग्य व नगररचना विभागाने संयुक्त पहाणी करुन तसेच मोजणीकरुन नियमानुसार पुढील यथोचित कार्यवाही करावी. तसेच शिक्षण मंडळाने शहरातील सर्व मनपाच्या शाळांबाबत पटसंख्या, स्थिती, सद्यस्थितीतील वापर इ. बाबत छायाचित्रासह अहवाल सादर करावा.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१३६ धुळे महानगरपालिके कडील अग्निशमन विभागा करीता अग्निशमन सेवांचे बळकटीकरण करणे करीता नवीनअग्निशमन वाहने व पुरक साधन सामग्री (उपकरणे) खरेदी करणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

सहा.अग्नि. अधिकारी धुळे शहराचा वाढता विस्तार व क्षेत्रफळ लक्षात घेता महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानाअंतर्गत सन २०२५-२६ या वर्षाच्या निधीमध्ये आपण अग्निशमन वाहने व साधन सामग्रीसाठी प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी महोदय यांचेकडे प्रशासकीय मान्यतेस्तव सादर करायचा आहे. त्यासाठी हा विषय मे. महासभेपुढे सादर झाला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक ते तात्काळ करुन तुमची मागणी तेथे नोंदवा. तेथे अधिकारी व कर्मचारी यांचे रहाणेकामी क्वार्टरची काय रिक्वायमेंट आहे.

उप अभियंता सगळयांचा समावेश झाला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे. प्रस्ताव तात्काळ मा. जिल्हाधिकारी सो यांचकडे सादर करावा.सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १३६ दिनांक २१/०२/२०२५**

धुळे महानगरपालिकेची स्थापना ३० जुन २००३ ला झाली. त्यानुसार धुळे मनपाचे क्षेत्रफळ ४६.४६ चौ.कि.मी इतके होते. परंतु नव्याने धुळे मनपा क्षेत्रात हद्दवाढ झाल्यानंतर १०१.०८चौ.कि.मी. आहे. सदरील क्षेत्र फळ व वाढत्या लोकसंख्ये नुसार धुळे महानगरपालिका अग्निशमन विभागाकरीता आग आपत्ती जोखीम घटना बघता अद्यावत साधन सामग्री (उपकरणे) मदत कार्यासाठी असणे गरजेचे आहे.धुळे महानगरपालिके कडे सद्य स्थितीत एकच अग्निशमन केंद्र आहे,नव्याने एक अग्निशमन उपकेंद्र प्रस्तावित असल्यामुळे धुळे मनपा अग्निशमन विभागांकडे अग्निशमन वाहनांची संख्या खूप कमी आहे. तसेच उक्त उपकरणांची पुर्तता करणे करीता महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान अंतर्गत (जिल्हास्तर -2025-2026) अग्निशमन सेवांचे बळकटीकरण करणे करीता नविन अग्निशमन वाहन (5000 हजार लिटर क्षमता मल्टी परपज फायर टेंडर) २ नग व अन्य अत्यावश्यक साधन सामग्री उपकरणे घेणे अत्यंत जरूरीचे आहे.

सदर अग्निशमन सेवांचे बळकटीकरण करणे (जिल्हास्तर)सन 2025 -2026 योजने अंतर्गत उक्त साधन समग्री खरेदी करणे करिता अंदाजे 50000000/ मात्र खर्च येणार असून सदर प्रस्ताव मे महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल विचारात घेता अग्निशमन सेवांचे बळकटीकरण करणे (जिल्हास्तर)सन 2025 -2026 योजने अंतर्गत नविन अग्निशमन वाहन (5000 हजार लिटर क्षमता मल्टी परपज फायर टेंडर) २ नग व अन्य अत्यावश्यक साधन सामग्री उपकरणे

घेणेसाठी प्रस्ताव सादर करण्यास वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१३७ मौजे चितोड ता.जि.धुळे सर्व्हे.नं.15/1,15/2 मधील 24 मी रुंद विकास योजना रस्त्याखालील भागाचे भूसंपादन बाबत्त आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा.आयुक्त तथा प्रशासक हे काम कशातुन करणार आहे व यासाठी किती पैसे लागतील.

सहा.अभियंता मौजे चितोड येथील सर्वे नं. १५/१ श्री संजय शेंडे व १५/२ ओमप्रकाश खंडेलवाल यांचे मालकीचे असुन सदर अभिन्यास १ मार्च २००८ रोजी नगररचना व मुल्य निर्धारण विभागाने मंजुर केला होता. त्यानंतर सदर क्षेत्र मनपा हददीत समाविष्ट झाले आहे. त्यांचे क्षेत्रफळ २४ मिटर रुंद रस्त्याने बाधीत होईल. याबाबत टीडीआर घेण्यास नकार दिला असुन त्यांनी उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका दाखल केली होती. न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार लॅण्ड ॲक्विझिशन करावे असे आदेशीत केले होते. याबाबत आपण सर्वोच्च न्यायालयात अपिल दाखल केले होते. पण सर्वोच्च न्यायालयाने आपले अपिल डिसमिस केले आहे. तसेच याबाबत सहा. संचालक नगररचना विभाग नाशिक यांचेकडील पत्रान्वये भुसंपादनाबाबत कायदेशीर / नियमानुसार योग्य ती कार्यवाही आपल्या स्तरावरुन करण्यात यावी. तसेच उच्च न्यायालयाचे आदेशाचे उल्लंघंन होणार नाही याची दक्षता घेण्याचे कळविले आहे. तरी भुसंपादन प्रक्रिया राबविण्याकामी सदर विषय मे. महासभेपुढे सादर झाला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक २४ मि. ने बाधीत होणारा रस्ता किती लेंथचा आहे.

सहा.अभियंता सदरचा विषय श्री. चव्हाण रावसाहेब यांच्याकडील आहे ते रजेवर आहेत. तरी साधारण ८०० मि. लेंथ येईल.

मा.आयुक्त तथा प्रशासक आणि अभिन्यास मंजुर करतांना २४ मिटरचा ॲप्रोच रोड कंसिडर करुनच अभिन्यास मंजुर केला असेल ना. २४ मिटरचा रस्ता दाखवला नसता तर अभिन्यास झाला नसता. अभिन्यास रिवोक करुन टाका. अभिन्यास मंजुर करतांना एक्सेस एफएसआय त्याचा द्यायचा किंवा टिडीआर त्याला कंपलसरी त्यावेळी द्यावाच लागला असता आपल्याला हा नाहक भुर्दंड आहे. मनपाची आर्थिक परिस्थिती नाही. त्यासाठी यामध्ये कोर्टात आपले म्हणणे व्यवस्थीत मांडावे आणि अभिन्यास रदद करण्याची प्रोसिजर सुरु करावी. कलम ५१ खाली रिव्होकेशन नोटीस काढावी आणि पुढील कार्यवाही करावी. युपीसीपीआर मध्ये नविन तरतुदी आल्या आहेत. त्याखाली कोर्टात सविस्तरपणे आपली बाजु मांडावी लागेल. मनपाची आर्थिक परिस्थिती नाही. हा अभिन्यास मान्यता हददवाढ होण्याच्या आधीचे आहे. ज्यावेळी हे सगळे मंजुर झाले हा लेआऊट मनपाने मंजुर केलेला नाही. आणि याची आर्थिक जबाबदारी मनपावर येते आणि ती रक्कम भरण्यास मनपा असमर्थ आहे. आणि रिव्हयु दाखल करायचा निर्णय

घ्यावा. तसेच रिव्होकशनची प्रोसिजर सुरु करावी.मा.आयुक्त तथा प्रशासक सदरच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १३७ दिनांक २१/०२/२०२५**

मौजे चितोड ता. जि. धुळे येथील सर्व्हे नं. 15/1 येथील श्री. संजय विष्णू शेंडे व स. नं. 15/2 मधील मिळकत श्री. ओमप्रकाश गोपालकृष्ण खंडेलवाल यांचे मालकीचे असून त्यांना नगररचना आणि मुल्य निर्धारण विभाग, शाखा धुळे या कार्यालयीन पत्र क्र. 158 व 159, दि.01 मार्च 2008 अन्वये रहिवास प्रयोजनार्थ अभिन्यासास मंजूरी दिली होती. उक्त स. नं. 15/1 व 15/2 मंजूर अभिन्यासातील एकूण क्षेत्र अनुक्रमे 29100 चौ.मी व 25900 चौ.मी असून त्यापैकी 24.00 मी. रुंद विकास योजना रस्त्याचे क्षेत्र अनुक्रमे 9406.62 चौ.मी. व 7742.87 चौ.मी आहे.

तथापि उक्त प्रकरणी संबंधिताना इकडील कार्यालया मार्फत TDR घेण्या बाबत विचारणा केली असता संबंधिताना TDR घेण्यास नकार दिला असून मोबदला रक्कम मिळण्याबाबत विनंती केली आहे.

तसेच श्री. खंडेलवाल यांनी उक्त विकास योजना रस्त्याचा वाढीव मोबदला मिळण्याबाबत मे.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका क्र.7496/2018 अन्वये दाखल केली असता सदर अपिलावर दि.11/10/2019 रोजी 10.“ The respondents shall initiate acquisition proceedings for the area of the land affected in the development plan road as per the layout sanctioned to the petitioners in the year २००८ of land gut No. १५/१ situated at village Chittod, Tq. and Dist. Dhule, after deducting the area that the petitioners would have required to provide for ०९ meter wide road. The valuation of the said area would be considered as on the date of sanction of the layout. The acquisition proceedings shall be initiated within a period of three (०३) months from the date of this order and shall be completed within the period as contemplated under the provisions of the Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act, २०१३. The petitioners would not be entitled for any rental compensation or any interest for the period the land was taken in possession by the respondents/State and the filing of the petition

11.in view of the aforesaid observations, the writ petition is accordingly disposed of no costs याप्रमाणे निर्णय झालेला आहे. या निर्णयावर धुळे महानगरपालिका तर्फे सर्वोच न्यायालय येथे अपील केली असता, “We are not inclined to interfere with the impugned order passed by the high court accordingly, the special leave petition are dismissed सर्वोच न्यायालयाने निर्णय पारित केला आहे.

तसेच या संदर्भात सहासंचालक नगररचना नाशिक विभाग नाशिक यांनी प्रकरणी भूसंपादनाबाबत कायदेशीर / नियमानुसार योग्य ती कार्यवाही आपल्या स्तरावून करण्यात यावी तसेच तसेच प्रकरणी मा. उच्च न्यायालय व सर्वोच न्यायालयाने आदेशित उल्लंघन / अवमान होणार नाही या बाबत योग्य ती दक्षता घ्यावी असे कळविण्यात आलेले आहे. तथापि उक्त प्रकरणी भूसंपादन प्रक्रिया राबवण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक असल्याने विषय मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, खालीलप्रमाणे कार्यवाही निर्देशित करण्यात येत आहे.

१) सदर अभिन्यास मान्यता मनपा हद्दवाढ होणेपूर्वी शासनाने दिलेली आहे. त्यामुळे मे. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार भूसंपादनाचा मोबदला देण्याची जबाबदारी तत्कालिन नियोजन प्राधिकरण म्हणून शासनाची असल्याने याबाबत शासनास कळविण्यात यावे.

२) अधिनियमातील तरतुदी व सद्यस्थितीनुसार सदर अभिन्यास मान्यता रद्द करता येईल किंवा कसे? याबाबत नगररचना विभागाने पडताळणी करावी.

३) तसेच सद्यस्थितीत मनपाची आर्थिक स्थिती लक्षात घेता सदर भूसंपादनाचा आर्थिक मोबदला देण्यास मनपा असमर्थ आहे. त्यामुळे याप्रकरणी पुर्नविलोकन याचिका दाखल करावी किंवा कसे? याबाबत संबंधित विधीतज्ञांचा कायदेशिर अभिप्राय घेवुन पुढील उचित कायदेशिर कार्यवाही व प्रक्रिया करणेस वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**(अमिता दगडे-पाटील)**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१३८ धुळे महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल उद्यान येथे उभारण्यात येणाऱ्या महात्मा बसेश्वर महाराज यांचा अर्धाकृती पुतळा उभारण्या कामी फेर ठराव होणे बाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

उपअभियंता धुळे मनपाच्या सरदार वल्लभभाई पटेल उद्यान येथे महात्माबसवेश्वर महाराज अर्धाकृती पुतळा उभारण्याकामी मा. कला संचालक, कला संचालनालय, पोलिस अधिक्षक यांच्या परवानग्या प्राप्त झालेल्या आहे. सदरचा ठराव २०२३ यावर्षी झालेला होतो. १ वर्षाचा कालावधी झालेला असल्याने फेरठराव करणेकामी सदरचा विषय हा मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यासंदर्भात मा. जिल्हाधिकारी सो यांच्याकडे बैठक लावुन पुढील कार्यवाही करावी. सदरच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १३८ दिनांक २१/०२/२०२५**

श्री.महात्मा बसेश्वर स्मारक समिती, धुळे यांचे तर्फे धुळे महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल उद्यान येथे उभारण्यात येणाऱ्या महात्मा बसेश्वर महाराज यांचा अर्धाकृती पुतळा उभारण्या कामी धुळे महानगरपालिका मार्फत ठराव पारित करण्यात आलेला आहे.

म.मुख्य वास्तूशास्त्रज्ञ, मुंबई- यांच्या मार्फत व म.कला संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई चबुत-याच्या आराखड्यास व क्ले मॉडेलला मान्यता दिलेली आहे.

म.पोलीस अधीक्षक , धुळे यांच्या कडील पत्र कं./ जिविशा / श्री महात्मा बसेश्वर महाराज पुतळा उभारणी परवानगी / 2920 दि.26/09/2024 रोजीच्या पत्रान्वये परवानगी प्राप्त आहे.

शासन निर्णय क्र. पुतळा — 3116 / प्र.क्र. 308/ 29 , मंत्रालय ,मुंबई — 400 034 दि.02 मे, 2017 मधील नमूद मार्गदर्शक तत्वे नुसार याकामी आवश्यक त्या परवानगी प्राप्त आहे. पुतळा समितीची मंजुरी मिळणे बाबत पत्र देण्यात आलेले होते.

त्यानुसार बैठक आयोजित करण्यात आली होती. परंतु सदर बैठकी पावेतो महानगरपालिकेचा महासभेच्या ठरावाची मुदत संपुष्टात आलेली असल्याने बैठक तहकूब करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागा कडील शासन निर्णयानुसार पुतळा उभारणेसाठी पारित केलेला ठराव 01 वर्षा पेक्षा अधिक जुना असू नयेत अशी तरतूद समाविष्ठ करण्यात आलेली आहे. त्यानुसार उक्त विषयास 01 वर्षाचा कालावधी झालेला असल्याने फेर ठराव करणे आवश्यक असल्याने फेर ठरावास मंजुरी मिळणेस मंजुरीस्तव प्रस्ताव महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार धुळे महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल उद्यान येथे महात्मा बसेश्वर महाराज यांचा अर्धाकृती पुतळा उभारण्या कामी फेर ठराव करण्यास वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-१३९ — संत गाडगेबाबा यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणेकामी फेरठराव होणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

उपअभियंता — धुळे मनपा इमारतीमध्ये राष्ट्रसंत श्री. गाडगेमहाराज यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणेकामी सन २०१७ साली महासभेत ठराव झाला होता. यासाठी कला संचालनालय, मुख्य वास्तुशास्त्रज्ञ तसेच मा. जिल्हाधिकारी महोदयांची परवानगी मिळाली आहे. तसेच अमोल गायकवाड महाराष्ट्र परिटसेवा मंडळ, माजी आमदार राजवर्धनजी कदमबांडे, श्री. संजय वाल्हे यांचे पुतळा उभारणेबाबत वेळोवेळी निवेदन आलेले आहे. १ वर्षाचा कालावधी झालेला असल्याने फेरठराव होणेकामी सदरचा विषय मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक — सदर पुतळा उभारणी संदर्भात विविध निवेदन प्राप्त झालेली आहेत. यात समाज संघटना तसेच आमदार महोदय, मा. पालकमंत्री महोदय यांनी पत्र सादर केलेले आहेत. या सर्वांचा उल्लेख ठरावात नमुद करावा. प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १३९ दिनांक २१/०२/२०२५**

धुळे महानगरपालिका शाळा क्र. ०१ येथील महानगरपालिकेच्या इमारती मध्ये राष्ट्रसंत श्री.गाडगेबाबा महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणेकामी ठराव पारित करण्यात आलेला आहे.

म.मुख्य वास्तूशास्त्रज्ञ (प्र.) , महाराष्ट्र राज्य , सार्वजनिक बांधकाम विभाग व , म.कला उप संचालक (प्रशा ) , कला संचालनालय , महाराष्ट्र राज्य , मुंबई बांधकाम भवन , मुंबई- ४००००१ यांच्या कडील पत्रान्वये सर्वसाधारण मान्यता व क्ले मॉडेलला मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

म.पोलीस पोलीस अधीक्षक , धुळे यांनी म.जिल्हाधिकारी , धुळे यांच्या कडे पत्रान्वये सदर पत्रात नमूद अटी शर्तीस अधीन राहून ना- हरकत सादर केलेले आहे.

म.उपसचिव महाराष्ट्र राज्य , नगरविकास विभाग , मंत्रालय मुंबई- ४०००३२ यांच्या कडील पत्रान्वये धुळे महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात मा.संत श्री.गाडगे महाराज यांचा पुर्णकृती पुतळा उभारण्यासाठीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, धुळे यांच्या अध्यक्षतेखालील समितीसमोर सादर करण्यासाठी, संबंधित प्राधिकरणांच्या आवश्यक असलेल्या मान्यता घेण्याच्या अटीवर व गृह विभाग, नगर विकास विभाग आणि सामान्य

प्रशासन विभागाने विहित केलेल्या अटी/शर्तीस अधिन राहून, ना-हरकत प्रमाणपत्र सादर केलेले आहे.

म.जिल्हाधिकारी सो., धुळे यांचे कडे दि. ०९/०२/२०२१ रोजी झालेल्या जिल्हास्तरीय पुतळा समितीची बैठकीनुसार म.जिल्हा दंडाधिकारी , धुळे ( गृह शाखा ) यांचे कडील पत्र क्र. २०१५ / ३ / कक्ष / ३ / पी.ओ.एल. / कावि / २२९ दि. १८/०२/२०२१ नुसार श्रीसंत गाडगे बाबा यांचा पूर्णाकृती पुतळा यापूर्वी प्रस्तावित केलेल्या ठिकाणी उभारणेस सामान्य प्रशासन विभाग यांचे कडील शासन निर्णय दि. ०२/०५/२०१७ मधील अटी व शर्ती तसेच भविष्यात शासना मार्फत करण्यात येणाऱ्या विनिमयाच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या अटी व शर्ती च्या अधीन राहून सदरची परवानगी देण्यात येत आहे असे कळविले आहे.

धुळे मनपा ठराव नं. १२७ दि. ३०/१२/२०२० अन्वये मनपा नूतन इमारतीच्या दर्शनी भागात साक्री रोड लगत असलेल्या जागेत ध्वजारोहण कार्यक्रमासाठी जागा राखीव असून स्वतंत्र दिन , प्रजासत्ताक दिन व महाराष्ट्र दिन प्रसंगी ध्वजारोहण कार्यक्रम आयोजित होतात. तसेच मनपाचेही अन्य कार्यक्रमासाठी जागेची आवश्यकता आहे. तसेच मनपा इमारतीच्या बाजूस जागेत व्यापारी संकुलाचे काम प्रस्तावित आहे. त्यामुळे उक्त जागा ध्वजारोहणासाठी व व्यापारी संकुलासाठी कायम स्वरूपी राखीव ठेवण्यात येत आहे असा ठराव पारित झालेला आहे.

श्री.राजवर्धन कदमबांडे , माजी आमदार , धुळे तसेच श्री. अमोल तुळशीराम गायकवाड , महाराष्ट्र परिट ( धोबी ) सेवा मंडळ , धुळे व श्री. संजय शरद वाल्हे , शिवसेना महानगरप्रमुख , धुळे यांनी संत गाडगे महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी विविध जागा पत्रान्वये सूचित केलेल्या आहेत.

उक्त बाबत म.प्रधान सचिव (२), नगरविकास विभाग , मंत्रालय, मुंबई- ३२ यांना या कार्यालया कडील पत्र क्र. / धुमपा / पापुवि / ८४३ दि.२४/०१/२०२५ अन्वये राष्ट्रसंत श्री संत गाडगे बाबा यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणे कामी योग्य ते मार्गदर्शन होणेकामी पत्र देण्यात आलेले आहे.

तरी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागा कडील शासन निर्णय अन्वये पुतळा उभारणेसाठी पारित केलेला ठराव ०१ वर्षा पेक्षा अधिक जुना असू नयेत अशी तरतूद समाविष्ठ करण्यात आलेली आहे. त्यानुसार उक्त विषयास ०१ वर्षाचा कालावधी झालेला असल्याने फेर ठराव करणे आवश्यक असल्याने सदरचा विषय मे.महासभेकडे मंजुरीसाठी सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता धुळे महानगरपालिका इमारतीच्या दर्शनी भागात संत गाडगेबाबा यांचा पूर्णाकृती पुतळा उभारणेकामी फेरठराव करणेस मान्यता वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १४० वित्तीय वर्ष २०२५-२६ पासून मालमत्ता व पाणीपट्टी कराची एकत्रित देयके एकाच संगणकीय प्रणाली (सिस्टीम) मार्फत देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

सहा. आयुक्त (कर) सन २०१५-१६ पासुन मालमत्ता कराची व पाणीपटटीची देयके वेगवेगळे देत आहेत. त्यामुळे पाणीपटटी कराच्या वसुलीवर परिणाम होत आहे. त्यामुळे पाणीपटटी व मालमत्ता कराची देयके एकत्रित करुन याआर्थिक वर्षापासुन सन २०२५-२६ या वित्तीय वर्षापासुन स्थापत्य कंपनी व असेंटेक कंपनी या दोन कंपन्यांवर जबाबदारी निश्चीत करणेसंदर्भात प्रस्ताव मे महासभेपुढे सादर केला आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक यामध्ये दोन तीन गोष्टी आहेत. शहराचे व हददवाढ भागातील मालमत्ता कराचे सॉफटवेअर दोन संस्थांमार्फत कार्यान्वित होत आहेत. आपण ३६ टक्के चा निर्णय ३० टक्के आणला. शहर व हददवाढ भागाचे टॅक्सेशन ३६ टक्केवरुन ३० टककेवर करणार आहेत. सोबत त्याचे घसारा स्लॅब सुधारीत केलेला आहे. सदर बाबतची अंमलबजावणी पुढील आर्थिक वर्षापासुन म्हणजेच दि. १ एप्रिल २०२५ पासुन करावयाची आहे. त्यानंतर ॲसेंटेककडे जो डेटा आहे शहराचा तो सगळा डेटा स्थापत्यकडे कोट करावा लागेल. आणि पाणीपुरवठयाच्या बाबतीत पण २-३ सॉफटवेअर आहे. तर हे एका ठिकाणी क्लब करायचे आहे. तसेच उपभोक्ता शुल्क पण यात ॲड होणार आहे. हे सर्व ॲड करुन एकच बिल आपण काढणार आहोत. सर्व बिले एकाच डिमांड नोट मधुन जाईल. हे करत असतांना सर्वांनी दक्षता घ्यायची आहे. की हे करतांना काही वगळले जाणार नाही. मागील थकबाकी उडणार नाही याची दक्षता घ्यावी. असे करतांना शास्ती उडवली व बिलही उडवुन टाकेले व अशा काही तक्रारी आल्या तर त्या पेठेचा क्लार्क, निरीक्षक, अधिक्षक हे सगळे जबाबदार असतील. यात दोन कंपन्या एकत्र करुन काम करुन घेतांना कुठलाही रेव्हेन्यु लॉस होणार नाही याची दक्षता घेवुन काम करावे लागेल. तर हे शिस्तित होईल. नाहीतर मनपाचे नुकसान होईल. याला आपण जबाबदार असाल. ठरावाच्या बेसिसिवर सर्वांना आदेश पण काढले जातील. पारदर्शकपणे सर्व गोष्टी करायच्या आहे. जेणेकरुन मनपाचे आर्थिक नुकसान होणार नाही. पाणीपटटीसाठीही जबाबदारी निश्चीत करण्यात यावी. यासाठी कालावधी कमी आहे. १५ एप्रिलपर्यंत हे सर्व झाले आहे का ते पण क्रॉस चेक करु. जप्तीच्या ज्या मालमत्ताधारकांना नोटीसा दिल्या आहे. त्याचे सिटी सर्वेला नावे नोंदवायला द्यावे. त्याच्या ऑक्शनची प्रोसिजर करावी. यासाठी टाईम बाऊंड प्रोग्रॅम मालमत्ता कर व पाणीपटटी विभागाचा राहिला पाहिजे. आदेश काढुन जबाबदाऱ्या निश्चीत कराव्या. त्याप्रमाणे प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**धुळे मनपा महासभा प्रशासक ठराव क्रमांक १४० दिनांक २१/०२/२०२५**

मा. आयुक्त सो., मा.अतिरिक्त आयुक्त सो, मा. मुख्य लेखाधिकारी, मालमत्ता कर अधीक्षक, व असेटेक प्रतिनिधी व स्थापत्य प्रतिनिधी यांच्या मध्ये दिनांक-१७/०३/२५ रोजी मुद्दे व निष्कर्ष बाबत चर्चा झाली त्यानुसार वित्तीय वर्ष २०२५-२६ पासून मालमत्ता व पाणीपट्टी कराची एकत्रित देयके एकाच संगणकीय प्रणाली (सिस्टीम) मार्फत देणेबाबत निर्णय झालेला आहे. त्यानुसार खालील कार्यप्रणालीची अंमलबजावणी आवश्यक आहे.

Responsibility Sthapatya:

1. सन २०२५-२०२६ दयेके Sthaptya ह्यांनी जनरेट करावी व बिलींग झाल्यावर त्वरित सर्व डेटा ASENTech ह्या संस्थेस त्वरित द्यावा जेणे करून Collection ASCENTech च्या संगणक प्रणालीतून करणे सुलभ होईल.

2. Sthaptya यांनी Water Tax चे देयक देखील Property Tax च्या देयक मध्ये एकत्रीत करावयाचे आहे.

3. स्थापत्य यांनी बिलावर ASCENTech यांनी दिलेला QR CODE व Payment Gateway Link यांची नोंद बिलावर देणे आवश्यक राहील

Responsibility ASCENTech

१) Ascentch यांनी फेब्रुवारी २०२५ अखेर data स्थापत्य कंपनीस टेस्टिंग व बिलींगसाठी देण्यात यावा.

२) मार्च महिना संपल्यानंतर थकबाकीसह संपुर्ण data ASCENTech यांनी स्थापत्य यांना देण्यात यावा.

३) स्थापत्य यांनी ASCENTech कडून घेतलेला data त्यावर स्थापत्य यांनी बिल प्रक्रिया पूर्ण करावी.

४) स्थापत्य यांनी बिल प्रकीर्या पूर्ण झाल्यानंतर संपूर्ण data हा ASCENTech कंपनीस देण्यात यावा.

५) ASCENTech यांनी बिलावर टाकण्यासाठी QR CODE व Payment Link दोन्हीही देयक /BILL Ganerate होण्या पूर्वी Sthapatya यांना देणे बंधनकारक राहील. तसेच Sthaptya यांनी तो बिलावर घेणे बंधनकारक राहील.

६)संगणकप्रणालीमध्ये धुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान झाल्यास ASCENTech व Sthaptya कंपनी यांचेवर जबाबदारी निश्चित करणे.

७) ASCENTech कंपनीमार्फत सर्व डाटा स्थापत्य संस्थेकडे वर्ग करतांना संबंधीत भाग लिपीक, निरीक्षक यांनी थकबाकीसह संपुर्ण डाटा तपासणी करावी. याबाबतची सर्व जबाबदारी संबंधीतांकडे राहिल.

त्यानुसार सदर प्रस्ताव मे. महासभेपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता वरील प्रस्तावात नमूद अटी शर्तीनुसार वित्तीय वर्ष २०२५-२६ पासून मालमत्ता व पाणीपट्टी कराची एकत्रित देयके एकाच संगणकीय प्रणाली (सिस्टीम) मार्फत देणेस मान्यता देणेत येत आहे. यात मागील मालमत्ताकराची थकबाकी व पाणीपट्टी थकबाकी वगळली जाणार नाही याबाबत संबंधित कंपनी संस्था तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी काटेकोर तपासणी करुन दक्षता घ्यावी. या कार्यवाहीत मनपाचे आर्थिक नुकसान झाल्यास संबंधित संस्था तसेच अधिकारी व कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चीत करण्यात येईल. वाचा क्र.१ ते २ नुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**